|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.1**

जळगाव, दि. ९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या कवयित्री बहिणाबाई अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने मंगळवार दि. १३ ऑगस्ट रोजी कवितांचे सादरीकरण आयोजीत करण्यात आले आहे.

बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी "बहिणाबाईंच्या कवितेतील सौंदर्य आणि सादरीकरण" या कार्यक्रमात अंबाजोगाई येथील कवी अविनाश भारती, जळगाव येथील प्रा.संध्या महाजन, आणि म्हसावद येथील विमल वाणाी हे कविता सादर करणार आहेत. मंगळवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात हा कार्यक्रम होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी राहणार आहेत.

**बातमी क्र.2**

जळगाव, दि. ९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या बौध्द अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी पुणे येथील डॉ. आनंद नाडकर्णी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

दि.१६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात डॉ.आनंद नाडकर्णी हे "बुध्दासोबत क्षणोक्षणी" या विषयावर व्याख्यान देणार असून अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे राहणार आहेत. व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती राहणार आहे.

**बातमी क्र.3**

जळगाव, दि. ९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक, शेतकरी सहाय्यता आणि ज्ञान विस्तार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी नोंदणीकृत व मान्यताप्राप्त संस्था, शाळा, महाविद्यालये यांच्याकडुन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. तसेच कौशल्याधिष्ठीत आणि रोजगाराभिमूख असे विविध प्रमाणपत्र, पदविका शिक्षणक्रम सुरु करण्याबाबतही प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

अनौपचारिक शिक्षणासोबत समाजपयोगी उपक्रम, पुरक कार्यक्रम आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने राबविले जातात. विद्यापीठ हे समाजातील-शिक्षण-प्रशिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. या विभागाच्या वतीने विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालये,तसेच सामाजिक संस्था यांना हे उपक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या विभागामार्फत जवळपास ४० विस्तारीत कार्यक्रम राबविले जातात. योग्य त्या प्रस्तावास कार्यक्रमाचे स्वरुप बघुन अनुदान देण्यात येईल. तरी अधिक माहितीसाठी विभागाच्या ०२५७ – २२५७४१५/४१६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी केले आहे.

---

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,
कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

( डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी